# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १६/१०/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १६/१०/२००६ रोजी सभा सुचना क्र. १८ दि. ११/१०/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंडोसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ११) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १४) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १५) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडेल अशी आशा बाळगतो व सभा चालविण्यासाठी नगरसचिवांना पुढील आदेश देतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११७ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, आपली परवानगी असेल तर विषय सुरू होण्यापुर्वी एक चर्चा म्हणून विषय आणतो. दिवाळी सण आता तोंडावर आलेला आहे आणि पाण्याची टंचाई वाढत चाललेली आहे. मध्यंतरी काही वर्षामध्ये पहिली आंघोळ असते त्यावेळी सुद्धा आंघोळीला पाणी मिळत नव्हते. यावेळी पण अशीच परिस्थिती आलेली आहे. याबबात आपण प्रशासनाला, पाणी पुरवठा विभागातील कोणी अधिकारी असतील त्यांना बोलावून पाण्याचा तुटवडा का भासतो याबद्दल त्यांनी निवेदन केले तर बरे होईल. त्यासाठी आपण स्थायी समितीद्वारे त्यांना काय मदत करू शकतो? त्यासाठी आपण जरा अधिका-यांना बोलवा. पाण्याचे हाल चाललेले आहेत. त्याचप्रमाणे रमझानचा महिना पण चालू आहे. त्यांनाही पाण्याची आवश्यकता आहे आणि याच्यामध्ये काही प्रभागामध्ये २४ तासात पाणी येते तर काही प्रभागामध्ये ४८ ते ६० तासानंतर पाणी येते. याबाबतही आपण त्याच्याकडून खुलासा करून घ्यावा. आणि पाणी कसे आपण सुरळीत चोवीस तासापर्यंत आणू यासाठी आपल्याला प्रयत्न करायचे आहेत. त्यामुळे पाणी पूरवठा विभागातील अधिका-यांना जर बोलावले आणि त्यांची काय अडचण आहे आणि तिथून पाणी का येत नाही की स्टेम प्राधिकरण आपल्याला पाणी कमी देते की आपले पाणी कुठे चोरी होते याचा खुलासा केला तर बरे होईल.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, पूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. पण आमच्या मिरारोडमध्ये पण रमझान महिना चालू झाला तेव्हापासून तसेच दोनतीन महिन्यापासून पाण्याची टंचाई आहे. पण रमझान

चालू झाला तेव्हापासून जास्तच वाढत चाललेले आहे आणि मिरा रोडचे लोक इथे मोर्चा घेउन आलेले. जे अधिकारी असतील त्यांनी त्याच्यावर काय उपाययोजना करायची किंवा काय तोडगा काढायचा याचा खूलासा करण्यात यावा.

**शशिकांत भोईर :-**

त्याचप्रमाणे कच-याचा प्रश्न मोठा उत्पन्न झालेला आहे. चार पाच दिवस झाले शहरातला कचरा उचलला गेलेला नाही.

**जयंत पाटील :-**

फटाके वाजवू नका.

**शशिकांत भोईर :-**

फटाके वाजवून नाही. गटारातली घाण आहे आणि रोजचा घरातला निघणारा कचरा आहे. तो तर निघणारच आहे ना? फटाके वाजवले नाही तरी काय फरक पडणार नाही. पण रोजचा कचरा निघतो त्याला काय उपाय काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य, पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने याठिकाणी जो प्रश्न सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने खुलासा करतो की, मिरा रोड परिसरातील काही नागरिक आलेले आहेत आणि कार्यकारी अभियंत्याच्या चेंबरमध्ये दहा बारा नागरिक आणि त्यांची चर्चा सुरू आहे. तत्पुर्वी सभापती साहेबांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे ही बैठक झाल्यानंतर संबंधित कायर्कारी अभियंता आणि आम्ही मा. सभापतींच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कक्षामध्ये बैठक घेउन आपण प्रस्तावित केल्याप्रमाणे ह्या दिवाळीमध्ये कोणत्याही प्रकारची नागरिकांना पाण्याची गैरसोय होउ नये या अनुषंगाने बैठक घेउन निश्चित नियोजन करू.

**शशिकांत भोईर :-**

त्याप्रमाणे कचरा आगाउ उचलला गेलेला नाही. मी आयुक्तांना काल स्वतः फोन केला. कारण माझ्या घरी दिडशे लोकांचा मोर्चा आला होता की, कचरा एवढा पडलेला आहे. त्याची दुर्गंधी पसरलेली आहे. रोगराई पसरायला वेळ लागणार नाही. अशी परिस्थिती आलेली आहे. मी आयुक्तांना फोन केला तर ते म्हणाले की, मला एक दिवस अजून द्या. आयुक्त प्रत्येक वेळेला दोन दिवस द्या, एक दिवस द्या असेच चाललेले आहे. शेवटी आपले प्रशासन कुठेतरी कमी पडते असे वाटते. मी मुकादम यांच्याशी पण चर्चा केली. त्यानंतर ते बोलले की, आमच्या ड्रायव्हरला मारले. डम्पींग ग्राउण्ड किंवा कच-याची विल्हेवाट कुठे लावायची हा विचार प्रशासनाने करायला पाहिजे ना? आम्ही खालच्यांना विचारले तर ते बोलतात की, मारतात म्हणून आम्ही जात नाही. प्रत्येकजण माराला तर घाबरणारच आहे. दुखापत झाली तर ती त्याला होणार आहे. या कच-याबाबत प्रत्येक वेळी दोन दिवस द्या. एक दिवस द्या असेच चाललेले आहे. म्हणजे या मिराभाईंदर क्षेत्रामध्ये असेच चालणार का दोन दिवस, एक दिवस?

**जयंत पाटील :-**

दुसरी एक गोष्ट अशी आहे की, आपण कचरा उचलण्यासाठी टेंडर दिलेले आहे आणि जर कचरा उचलत नसतील तर त्या ठेकेदाराला पैसे देउ नका.

**प्रभात पाटील :-**

कचरा उचलून टाकायचा कुठे?

**जयंत पाटील :-**

तो त्यांचा लुकआउट आहे.

**मा. सभापती :-**

कांबळे, जागा मिळाली का?

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. स्थायी समिती सदस्य श्री. रतन पाटील ह्यांनी जागेची काही व्यवस्था केली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या अनुषंगाने उपायुक्त, आरोग्य विभाग त्याचा खुलासा करतील.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो. काही दिवसामध्ये जो जागेचा प्रश्न निर्माण झालेला होता आणि त्यामुळे कचरा उचलणे, त्याची विल्हेवाट लावणे यामध्ये अनियमितता वाढलेली होती. परंतु, त्याबाबत जागा मिळविण्यासाठी आम्ही बरेच प्रयत्न केले. त्याला सन्मा. सदस्यांनी फार चांगले को-ऑपरेशन केलेले आहे आणि मला आपल्याला सांगायला आनंद वाटतो की, एक जागा आपल्याला मिळालेली आहे. त्याची कागदपत्रेही तयार झालेली आहेत आणि त्याप्रमाणे आजपासून आपण त्या ठिकाणी कचरा टाकायला सुरूवात केलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

पण साहेब, आता आपल्याला ही जी जागा उपलब्ध झालेली आहे त्यात काही दिवसाचा, किती महिन्याचा, किती वर्षाचा कचरा राहणार आहे? याचा खुलासा करा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याला कचऱ्यासाठी प्रश्न साधारणतः सहा महिन्याचा आहे. पण आपले जे दोन्ही प्रोजेक्ट आहेत ते सहा महिन्यामध्ये पुर्णत्वाने कार्यान्वीत होत आहेत. जी जागा आपण बघितलेली आहे त्या ठिकाणी आपण सहा महिने निश्चितपणे कचरा टाकू शकतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आता सहा महिन्यांनी तो प्रोजेक्ट चालू होणार आहे ते समझा आपल्या कागदावर आहे. पण कृती करताना जर झाले नाही. सहाचे आठ महिने झाले, एक वर्ष झाल मग त्यानंतर आपण कचऱ्याचे काय करायचे?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

शक्यतो असे होणार नाही. कारण एक जो प्रोजेक्ट आहे पन्नास टनाचा तो जवळपास निम्म्यावर आलेला आहे. म्हणजे त्याची सुरूवात झालेली आहे. त्याचे कॉलम्स वगैरे पडलेले आहेत आणि साधारणतः दोन ते तीन किंवा चार महिन्यामध्ये जास्तीत जास्त तो प्रोजेक्ट कार्यान्वीत होईल. दुसरा जो प्रोजेक्ट आहे.....

**शशिकांत भोईर :-**

कार्यान्वीत म्हणजे मशिनरी येउन त्याला पॉवर सप्लाय लागेल त्याचे काय?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याला ज्या मशिनरी लागतात ते त्यांनी वाळूबच्या एका कंपनीमध्ये त्यांनी फॅब्रीकेशनची ऑर्डर दिलेली आहे. ती मी स्वतः जावून बघितलेली आहे. त्या मशिनरी त्यांच्या तयार झालेल्या आहेत. त्यांचे इथे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाले तर त्या ठिकाणी ते इमिजिएटली इंस्टॉल करणार आहेत. तर त्याचा पाठपुरावा मोठ्या प्रमाणावर चालू आहे. दुसरा जो आपला चारशे टनाचा प्रोजेक्ट आहे जो राजकोटच्या धर्तीवर मंजुर केलेला आहे त्याचे सुद्धा आपण ॲग्रीमेंट केलेले आहे. वर्क ऑर्डरही दिलेली आहे आणि त्याचे जे कंपनीधारक आहत त्यांनी त्या फॅब्रीकेशनच्या कामालाही सुरूवात केलेली आहे. तर आपण त्या चारशे प्लस टनाचा जो प्रोजेक्ट आहे. त्याच्यासाठी सुद्धा आपण आपला भरपूर पाठपूरावा करत आहोत आणि साधरणतः सहा महिन्यामध्ये हे दोन्ही प्रोजेक्ट होतील इथपर्यंत आपला पाठपूरावा निश्चित आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुमचा प्रोजेक्ट सहा महिन्यात पुर्ण व्हावा याबद्दल आमच्या हार्दिक शुभेच्छा. आम्ही तुमच्या पाठिशी आहोत. आमच्या सभागृहामधून ज्या मंजुऱ्या असतील त्यापण मिळतील. पण ह्या कचऱ्याची विल्हेवाट लवकरात लवकर लावावी की, या कचऱ्यामुळे आपल्या शहरामध्ये रोगराई पसरणार नाही याची आपण जास्तीत जास्त दक्षता घ्यावी ही तुम्हाला विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बोलतोय. एकतर स्पष्ट दिसून येते. एकतर आरोग्य विभागाला सगळ्यांची एकी म्हणून आपल्याला कोण मदत करत नाही, असे तुमचे म्हणणे असेल तर तसे सांगा किंवा तुमची क्षमता जी आहे की, तुम्हाला जे सँक्शन मिळते ते अपुरे मिळते असे तरी सांगा. नाही तर तुम्हीच असे मनाशी ठरवलेले आहे की, जसा लपंडाव चालतोय तसे लोकांना तसे ह्या लोकांना जसे एक सीझन येते, पाउस येतो, उन्हाळा येतो, हिवाळा येतो तसे तुम्ही लोकांना असे तयार करायला घेतलेले आहे की, तुमच्या दारात पडलेला कचरा, ह्याने त्याने कोणी जरी सांगितले तरी, नगरसेवकांनी सांगितले, आत्ता सांगतो, उपायुक्तांना सांगितले आत्ता सांगतो, आयुक्तांना सांगितले आत्ता सांगतो. तर तीन चार दिवसांनी कचरा उचलेल. म्हणजे तो कुजेल, घाण येईल. तिथूनच नगरसेवकांनी जायचे, तिथूनच आयुक्तंनी जायचे, तिथूनच सोसायटीच्या लोकांनी जायचे असे सिझनिंग तुमचं सगळी मानसिकता तयार करायची तुमची ही पद्धत चालली आहे का? तुमचे कार्यक्रम काय आहेत? तुमचा लपंडाव चालू आहे हे आम्हालाही समजते. पण तुमची अशी यंत्रणा आहे जी काम करते किंवा ज्या पद्धतीने हा कचरा पाच मिनिटांत, पंधरा मिनिटांत, एक तासात, दोन दिवसांत असे काहीच नाही. आत्ता चार दिवसांपूर्वी माझ्याकडचा कचरा उचलला. सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलल्यानंतर तीन दिवस झाले माझ्या वॉर्डात कचरा पडलेला होता. आत्ता सकाळी गाडी लागलेली आहे. म्हणजे तीन दिवसांचा जमा झालेला कचरा आज उचलला. आत्ता आजचा तो नंबर गेला कचरा उचलायचा की परत तीन दिवसांनी येणार. म्हणजे तीन दिवसांपर्यंत त्या सोसायटीच्या लोकांनी, दुकानदारांनी, येणाऱ्या पाहूण्या माणसांनी अशी सिस्टम चालते असे समजून घ्यायची मानसिकता करायची की कशी?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने मी सन्मा. सदस्यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने ह्याठिकाणी खुलासा करतो. आपल्याला मुख्य अडचण जागेची होती आणि ती जागेची अडचण दूर झालेली आहे. इथे येण्यापूर्वी संबंधित विभागाचे श्री. अजिज शेख साहेब किंवा श्री. राजकुमार कांबळे यांच्याशी चर्चा झालेली आहे. दोन दिवसांत आपल्या शहरातला सर्व कचरा आम्ही पुर्णपणे उचलून आपल्या निदर्शनास आणून देतो.

**रोहिदास पाटील :-**

कोणत्या बेजबाबदारपणे तुम्ही उत्तर देउन मोकळे झाले? आम्ही तुम्हाला काय म्हणतो तुम्ही असे निवेदन करू शकत नाही की, आरोग्य खात्याला पुर्वी लागणाऱ्या सहा डंपरच्या ठिकाणी आज बारा डंपर

दिलेले आहेत असे निवेदन तुम्ही कोणीही अजुनपर्यंत केलेले नाही. तुमच्या गैरहजेरीत परवा आम्ही आयुक्त साहेबांना विचारले होते. तशी जर प्रोव्हीजन नसेल तर ते एकच डंपर किंवा तीनच डंपर दिवसाला जेव्हा नउ फेऱ्या मारायच्या असतील. तीन दिवसांच्या नउ त्रीक सत्ताविस झाल्या. सत्ताविस फेऱ्यांचा कचरा उचलायला एका दिवसाचे नउ डंपरचे काम करतील. नउ फेऱ्यांच काम करतील. दोन दिवसांचा बाकी राहतो. एक्स्ट्रा मशिनरी, एक्स्ट्रा मनुष्यबळ हे तुम्ही देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या अनुषंगाने आपल्याला जे अपेक्षित आहे ते वाहन लावण्यासाठी मा. आयुक्तांनी ऑलरेडी त्यांना मंजुरी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

लागले पाहिजे का नाही? तुम्ही उपायुक्त (मु.) म्हणून तुम्ही त्यांना सहकार्य करत नाही. हे उपायुक्त आहेत. दुसऱ्या उपायुक्तांचे हे सहकार्य मागत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे काही नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला त्याचा रिझल्ट पाहिजे. आत्ता तुम्ही खात्रीपुर्वक बोललात. आता कोण सांगेल की, माझा प्रभाग आठ दिवसांमध्ये नीट साफ आहे. असे कोण सांगू शकतो का? सोळापैकी कोणीही सांगू शकणार नाही. कारण ती वस्तुस्थिती आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

पण आपल्याकडे जागाच नव्हती. पण आता आपल्याला जागा मिळालेली आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

ज्या वेळेला आपल्याकडे जागेचा प्रश्न नव्हता......

**मा. सभापती :-**

पूर्ण शहरातला कचरा दोन दिवसात उचलला पाहिजे अशी मी रूलिंग देतो.

**रोहिदास पाटील :-**

असे काहीतरी करा. सध्या दिवाळी आहे. वर्षभर न झाडलेले घर या दिवाळी निमित्त झाडले जाईल, साफसफाई होईल, कारखाने आहेत, आजुबाजुला सोसायटी आहेत, सोसायटीमधून येईल. वर्षभर साफसफाई करणार नाही ती दिवाळी निमित्त करणार. मग तो निघालेला कचरा उचलायला तुम्ही कोणाला ऑर्डर दिलेली आहे? किंवा पंचवीस डंपरच्या ठिकाणी पंच्याहत्तर डंपर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही दोन दिवसांची वेळ दिलेली आहे हे बरोबर आहे. पण त्यांना जी जागा मिळालेली आह ती जागा कुठे आहे? ते त्यांनी स्पष्ट करावे. ह्यांना जवळ जवळ तीन ते चार ठिकाणी जागा मिळाली होती. तिथे कचरा टाकायला गेले आणि लोकांनी विरोध केला आणि परत त्यांनी जे भाडे दिले होते. जो ॲडव्हान्स दिला होता ते सगळ..........

**मा. सभापती :-**

जागा कुठे आहे याचा खुलासा करा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

ईस्टमध्ये ती जागा आहे. भाईंदर ईस्टला जागा आहे.

**जयंत पाटील :-**

सर्व्हे नंबर व लोकेशन सांगा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

कनकियाच्या मागे ती जागा आहे. कारण तिथे जाळी करणे योग्य वाटत नाही. कारण कोणीतरी तिथे आमच्यावर दबाव आणतो म्हणून तिथे जरा..............

**जयंत पाटील :-**

तुम्ही तिथे कचरा टाकल्यावर कोणी दबाव आणला तर?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

नाही. दिड एकर जागा आहे.

**रतन पाटील :-**

चांगली गोष्ट आहे. कनकियाच्या मागे. पण मला सभागृहाला एक सुचना करायची आहे. आपली बरीचशी आरक्षणे आपल्या ताब्यात आलेली आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

ती सगळी शहरामध्ये आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मा सभापती साहेब, एका पाईपलाइनने या शहरातील साडेसात लाख लोकांना पाणी पुरवठा होतोय. आत्ता ज्या अतिरेकी कारवाया आहेत त्या दृष्टीकोनातुन एखादी अशी कोणती घटना घडली गेली. आपण सुरक्षिततेचा उपाय म्हणून पाणी पुरवठा खात्याला स्पेशल ॲथोरिटी दिलेली आहे. जी सिक्युरिटी आहे किंवा जी मशिनरी आहे ती असे निवेदन करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या अनुषंगाने आपले पत्र पाणी पुरवठा विभाग कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर केलेले आहे. अपेक्षा अशी आहे की, त्या अनुषंगाने त्यांनी त्यासाठी जो काही अहवाल सादर केला. मला असे वाटत नाही की, पाईपलाइनला कोणीही धोका करेल आणि अशी परिस्थिती निर्माण होईल. आवश्यकता असल्यास आपण तिथे सिक्युरिटी इस्कॉर्टींग करायला सुद्धा..........

**रोहिदास पाटील :-**

ते फोडल्यानंतर? लोक तडफडल्यानंतर? ही अशीच मेंटेलीटी सगळ्या अधिकाऱ्यांची होत चालल्यामुळे हे असच चित्र वाढल चालले आहे असे जर म्हटले तर चुक नाही.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आजचा लोकसत्ता आपण वाचला असेल.......

**रोहिदास पाटील :-**

साहेब ह्यातल्या मी दोन सुचना सांगतो ज्या सर्वांच्या हिताच्या आहेत, दुर्लक्षीत करण्यासारख्या नाहीत. जसे, पाणी मिळविण्यासाठी आपल्या सर्वांचे एकमत आहे. आपण ठराव केले, सगळे झाले. त्याचबरोबर एक बाजूसे अपेने को जो पानी आता है। दुसरा उसको सोल्युशन है। एक दिन मे नही होगा। बिच मे ऐसा ना हो इसलिये पर्याय है। जैसे थाना से एक बाजू से अपना पानी आता है। उसमे बातचीत करके अपना जैसा मुलुंड से, बोरीवली से जो बी.एम.सी. का पाईपलाईन आता है। उधर से १०-२० एम.एल.डी. जो भी पानी आये तो कभी भी, कुछ भी घटना होगी तो पानी पानी बोलके आदमी मरेंगे नही या दंगा नही होगा। अमुक परसेंटेज पार्टली पानी शहरमे आयेगा। आज साडेसात लाख लोग एक बाजू पर है।

**रतन पाटील :-**

मराठीत बोला, कोणासाठी खान साहेबांसाठी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ह्यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी खुलासा करतो. महापालिकेच्या बाहेरची गोष्ट आहे. गेल्या वर्षी जो प्रलयकारी पाउस झाला. त्यामध्ये बदलापुर - अंबरनाथ, कल्याण - डोंबिवली महापालिकेच्या पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय आला. त्यांचे जे पंपिंग मशिनरी आहे ते सबमर्ज झाले, इश्यु झाले होते. पण शासनाने, एम.जी.पी ने चोविस तासाच्या आत, पॅरेलेल अरेंजमेंट विचारात घेता इतर ज्या योजना आहेत त्याचे क्रॉस कनेक्शन करून तिथे पाणी रिस्टोअर केलेले आहे. अशा परिस्थितीत शासन आपल्याला परके करणार नाही. सगळ्या प्रकारची उपाययोजना तपासून कार्यवाही केली जाते.

**रोहिदास पाटील :-**

या शहराच्या साडेसात लाख लोकांच्या भविष्याच्या दृष्टीने आम्हाला पर्यायी दुसऱ्या बाजुने पाणी पुरवठा करण्यासाठी पत्रव्यवहार कराल की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कार्यकारी अभियंता ह्यांनी याबाबतची नोंद घेउन संबंधित खात्याच्या मुख्य अभियंत्याकडे अशा प्रकारचा अहवाल पाठवावा असे मी या ठिकाणी सुचित करतो.

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो.....

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने सांगतो, २६ जुलैच्या महाप्रलया नंतर गव्हर्नमेंटने ज्या ज्या शहरामध्ये एकच लाईन असते. एका लाईनला डिस्टर्ब झाल्यानंतर पुर्ण शहराचा पाणीपुरवठा खंडीत होतो त्याच्यासाठी एम.जी.पी.चे मुख्य अभियंता साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक कमीटी नेमली होती. त्यांनी पुर्ण ठाणे जिल्ह्यातल्या मिरा-भाईंदर, उल्हसनगर, भिवंडी, ठाणे आणि मुंबई ह्या महापालिकांच्या पाईपलाईन्स कुठून गेलेल्या आहेत, प्रत्येकाचा डायमिटर काय, प्रत्येकाचे प्रेशर काय आणि अशा आपात्कालीन परिस्थितीमध्ये त्या कुठे जोडल्या गेल्या तर शहराचा पाणी पूरवठा सुरळीत चालू राहील, एकदम हाहाकार माजणार नाही तशा प्रकारचा त्यांनी संपूर्ण अहवाल तयार करून तो महाराष्ट्र शासनाकडे त्यांनी मागच्या आठवड्यात माझ्या माहितीनुसार सादर केलेला आहे. त्याची प्रत अद्याप आपल्याला मिळालेली नाही. ती कॉपी मागवून घेतो. ह्याच्यावर पूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये कुठल्याही परिस्थितीत मिरा भाईंदरला काहीही प्रॉब्लेम झाला तर ते अन्य कुठुन ताबडतोब शहराचा पाणी पूरवठा सुरळीत कसा करता येईल याच्यावर स्पेशल कमिटी नेमलेली होती, आणि त्यांनी त्याचा पुर्ण अभ्यास करून गव्हर्नमेंटला अहवाल दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

श्री. बारकूंड साहेब, आपली सूरूवातीची ५० एम.एल.डी ची लाईन टाकलेली आहे. त्याच्या अगोदर जी आपली जुनी पाईपलाईन होती ३० एम.एल.डी ची तीची सध्या काय स्थिती आहे. कास्टींगची, सी.आय ची.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही कुठली बोलता?

**रतन पाटील :-**

सुरूवातीची ह्या ५० एम.एल.डी च्या अगोदरची.

**शिवाजी बारकुंड :-**

सायमल्टेनियसली दोन्ही लाईन चालू आहेत. त्यातली पहिली लाईन जी तुम्ही बोलता, आत्ता जे आपण बोलतोय की, नविन पाणी घ्यायचे वगैरे तर ह्या लाईनमध्येच कॅपेसिटी आहे. नवीन ३५ एम.एल.डी आपण पाणी घेणार आहोत. ते ह्या लाईनमधूनच पाणी घेणार आहोत. ह्याच्यामध्ये आपण नवीन लाईन टाकणार नाही.

**रतन पाटील :-**

पण तिची परिस्थिती काय?

**शिवाजी बारकुंड :-**

तिची परिस्थिती चांगल्या स्थितीत आहे. वेगवेगळ्या ठिकाणी तिचे क्रॉस कनेक्शन करून ठेवलेले आहेत. ते आपल्याला वापरात आणता येतील.

**रतन पाटील :-**

ती जूनी पाईपलाईन चालू आहे की नाही?

**शिवाजी बारकूंड :-**

ती लाईन चालू आहे आणि ती लाईन स्टेमने एम.एस.आर.डी.सी.चे जे काम आहे त्याच्यामुळे ते रस्त्याच्या कडेला शिफ्ट करण्याबाबत स्टेमच्या स्तरावर त्याची कार्यवाही चालू आहे. ती लाईन चालू आहे.

**रतन पाटील :-**

आत्ता ठाणे रोडला ज्या पाईपलाईन्स पडलेल्या आहेत त्या कशासाठी?

**रोहिदास पाटील :-**

ती लाईन अद्याप बंद आहे.

**रतन पाटील :-**

बंद आहे.

**शिवाजी बारकूंड :-**

तिचा वापर आपण चालू करू शकतो.

**रतन पाटील :-**

ठाणे रोडला आत्ता पाईप पडलेले आहेत.

**शिवाजी बारकूंड :-**

ते पाईप आपले नाहीत.

**रतन पाटील :-**

मगाशी तुम्ही बोललात की ते पाईप आपले आहेत.

**शिवाजी बारकूंड :-**

कुठले?

**रतन पाटील :-**

ठाणे रोडवर.

**शिवाजी बारकूंड :-**

ठाणे रोडला कुठे पाईप आहेत?

**रतन पाटील :-**

ओवळा आणि त्याच्या लाईनला.

**शिवाजी बारकूंड :-**

एक लक्षात घ्या. मिरा भाईंदरला पाणी पुरवाठा आपल्या टाकीपर्यंत आणून द्यायची जाबाबदारी स्टेमची आहे. आपण सगळच आपल्यावर घेतो. आणि ते पाईप जे पडलेले आहेत ते पाईप आपले नाहीत.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या दिवशी श्री. काकडे यांनी सांगितले की, सी.आय.च्या लाईन तुटलेल्या आहेत म्हणून बदली करायच्या आहेत. श्री. काकडे यांनी सांगितले की, सी.आय.ची लाईन खराब झालेली आहे. ती आपल्या लाईनला जोडणार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

काय तुम्ही निर्देश दिले आहेत?

**शिवाजी बारकूंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, सुरक्षेच्या दृष्टीने ह्याच्यावर स्टेम प्राधिकरणामध्ये कार्यकारणी समितीच्या बैठकीत चर्चा झाली होती आणि सदर सर्व लाईनवर शहाडपासून भाईंदरपर्यंत भिवंडी आणि ठाण्यापर्यंत पेट्रोलिंग आणि सुरक्षा ह्याच्यासाठी आपण सर्वांनी तिथे मुद्दा उपस्थित केला होता. तो मान्य पण झालेला आहे. परंतु, तिथे मध्यंतरी सुरक्षेचे जे टेंन्डर आहे त्याला गव्हर्नमेंटकडून बंदूकधारीला लायसन्स मिळत नाही. त्याच्यावर थोडा वाद चालला होता. त्यामुळे ते टेंडर प्रलंबित राहीले. आत्ता त्याच्यावर कार्यवाही चालू आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जेव्हा आपली ठाण्याला स्टेमच्या अधिका-यांशी मिटींग झाली ते केबल जोडणार होते त्याचे काय झाले? तुम्ही त्याच्याबद्दल विचारपूस केली का?

**शिवाजी बारकूंड :-**

विचारपूस नाही. मी स्वतः टेमघरला जाउन पाहून आलो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जॉईन्ट केली का?

**शिवाजी बारकूंड :-**

जॉईन्ट केलेली नाही. केबल टाकायचे काम पूर्ण झालेले आहे. अजून जोडलेली नाही. मी स्वतः जाउन आलो तिथून.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण आपल्याला पंधरा दिवसाची वेळ दिलेली आहे.

**शिवाजी बारकूंड :-**

आपण फक्त फॉलो-अप करू शकतो. आपल्याकडे त्याच काय आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याला त्यांनी पंधरा दिवसाची वेळ दिली होती की नाही?

**शिवाजी बारकूंड :-**

हो दिलेली होती.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आत्ता एक महिना झाला.

**शिवाजी बारकूंड :-**

नाही त्याचे काम पुर्ण झाले नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याचा पाठपूरावा करा.

**शिवाजी बारकूंड :-**

पाठपुरावा करतो आहे. माझा सतत पाठपूरावा सूरू आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

बारकुंड साहेब, ही जी पाण्याची टंचाई चालू आहे, ही किती दिवसापर्यंत राहणार आहे?

**शिवाजी बारकूंड :-**

मॅडम ह्याच्या बद्दल काही सांगू शकत नाही. सगळ्यांना कल्पना आहे तिकडे एम.एस.ई.बी. चे पाणी ७० किलोमिटर वरून येते. एम.एस.ई.बी. चा पॉवर फेल्युअर दहा मिनिटे झाला तरी शहराचा पाणी पुरवठा तीन तास खंडीत होतो. यासाठी मिरा भाईंदर दिड वर्ष झाले शहाड - टेमघर पातली पाडा येथे एम.एस.ई.बी. च्या पॉवर शिवाय अन्य सोर्सेस पॉवरचा तिथे उभा करावा म्हणून भांडत आहे. त्यापैकी फक्त पातली पाड्याच्या जनरेटर सेटची मागणी मान्य होउन त्याच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत, स्टेम कार्यालयाकडे.

**जेन्वी आल्मेडा :-**

आज सकाळी आमच्या उत्तनला पण मी टाकीवर गेलेले तर साडेतीन मीटर पाणी टाकीमध्ये आहे. जेमतेम दहा मिनिटे पाणी सोडले संपुर्ण शहरासाठी शनिवारी तर पाणीच नव्हते. कालपण पंधरा मिनिटेच सोडले. म्हणजे किती दिवस ही पाण्याची टंचाई चालू राहिल.

**शशिकांत भाईर :-**

बारकुंड साहेब, याबाबतीत मी सभागृहाला एक माहिती देतो की, ज्यावेळेस आपले पाणी खंडीत होते. तद्‌नंतर आपण टँकरद्वारे पाणी पुरवठा करतो. सव्वा तिनशे रूपये किंवा अन्य पैशाने ते तुम्ही जोपर्यंत पाणी सुरळीत होत नाही तोपर्यंत टँकर जाण्याचे बंद करा ना. तो प्रवाह त्या टाकीमध्ये गेला तर पाणी चांगले येईल. दहा मिनिटाला जरी दोन टँकर गेले ........

**शिवाजी बारकुंड :-**

दहा मिनिटाला दोन टँकर नाही. शहरामध्ये अशा ब-याचशा इमारतीपण आहेत जिथे अद्याप पाईपलाइन गेलेली नाहीत. तिथे पण नागरिक राहतात. त्यांनापण टँकरची व्यवस्था लागते. सन्मा. नगरसेवक वारंवार मागणी करतात. त्यावेळेस तिथे नागरिकांच्या दृष्टीने टँकर दिला जातो.

**शशिकांत भोईर :-**

तरीपण आपल्या त्या टाकीतून कमीत कमी पाच ते सात एम.एल.डी. पाणी जात असेल की नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मघाशी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी सुरक्षेच्या विषय जो निघाला होता. आपण मुंबई महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका. उद्या मुंबई महानगरपालिकेची जर लाईन तुटली. जर त्यांचा आपल्याशी संबंध जोडलेला असेल तर त्यांना ही प्रसंगाला उपयोग पडू शकतो आणि आपल्यालाही उपयोग पडू शकतो. म्हणून त्यांची मिटींग घेउन आपण तसा प्रयत्न करायला पाहिजे. हे शासनाच्या लेव्हलला करायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११७ वाचलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, हे जे समाजमंदिर आहे. मला जरा त्याची माहिती पाहिजे होती. त्या समाज मंदिरामध्ये व्यायामशाळा पण आहे आणि त्याच्यामध्ये समाजमंदिर पण दाखवलेले आहे. तद्नंतर तिथे बालवाडी किंवा अंगणवाडी सुरू असते. जर तिथे अंगणवाडी सूरू असेल तर त्यांना कुठे ठेवायचे? त्यांची कुठे व्यवस्था करायची?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ज्यावेळी बालवाडी किंवा अंगणवाडी चालू असेल त्यावेळी ते चालू द्या ना आणि उरलेल्या वेळामध्ये संगणक प्रशिक्षण ...

**रोहिदास पाटील :-**

जर रेकॉर्डवर आणायचे असेल तर मी पुन्हा बोलतो. समाजमंदिरे ही महापालिकेने बनविली आहेत. ही बहूउद्देशाने बनलेले आहेत. ही सर्वसामान्याला मिळायला पाहिजे. फिक्स असेसमेंट जिथे फिक्स लागेल तेव्हा तिसरा उभा राहू शकणार नाही आणि सामान्य माणसाचे कोणीही ऐकणार नाही मी एका विशिष्ठ समाजमंदिरा बाबत बोलत नाही. मिरा भाईंदर मधील कोणतीही समाजमंदिरे असतील ती तुम्ही कोणालाही परमनन्ट दोन वर्षे तीन वर्षे अशा पद्धतीत देउ नका. या मताचा मी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विषय त्यांना वाचू द्या आणि त्यानंतर आपण निर्णय घ्या ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, विषय वाचला ना मग चर्चा होणे गरजेचे आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सुचकाने विषय वाचल्यानंतर आपण चर्चा करा मग तो मंजुर का नामंजुर तो निर्णय होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर पश्चिम आंबेडकर नगर येथे महानगरपालिकेचे असलेले समाजमंदिर व व्यायामशाळा इमारत यांचे एकूण क्षेत्रफळ समाजमंदिराचे ६७१ चौ.फुट आहे आणि व्यायामशाळा ३८७ चौ. फुट आहे असे एकूण १०५८ चौ.फुट असून सदर जागा मे. सांगली जिल्हा सदिच्छा मित्र मंडळ ह्यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण शिबीर तसेच बचत गटात कार्यरत असलेल्या महिलांना स्वयंरोजगार केंद्र याचे प्रशिक्षण देण्याकरिता भाड्याने एक वर्षे मुदतीत जर आपण त्यांना दिले तर गरीब विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण सुद्धा मिळेल आणि महिलांना आपला स्वयंरोजगारासुद्धा उपलब्ध करून देउ शकतो.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना आवश्यकता असेल किंवा रिकामी असेल तेव्हा द्यायची सुविधा ठेवा ना. पण त्यांनाच देण्याची सुविधा नसावी असे आमचे ठाम मत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे उरलेल्या वेळेमध्ये म्हणजे तिथे जर बालवाडी सुरू असेल, अंगणवाडी सुरू असेल......

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी अर्ज करावा त्या दिवसापुरता त्यांना मिळेल. त्यांना पझेशन देणे हे महापालिकेतील कोणत्याही समाजमंदिराबाबत निर्णय घेउ नये. मा. आयुक्त साहेब, महापालिकचा किंवा शासनाचा जो उद्देश आहे तो तुम्ही पोटतिकडीने आमच्या समोर मांडला पाहिजे की, शासनाने कशासाठी हा निधी मंजुर केलेला आहे.

सर्वसामान्य माणसाला न्याय मिळावा, त्याला हक्काचा आधार असावा ह्या महापालिकेतील कोणत्याही जागेवर जाउन तो उभा राहू शकतो त्याठिकाणी. त्यासाठी तो खर्च आपण केलेला आहे. सत्संगसाठी देण्यासाठी नाही.

**शशिकांत भोईर :-**

तिथे झोपडपट्टया आहेत. काहींची लग्नकार्य होत असतील किंवा आणखी कार्य होत असतील तर समाजमंदिर नाही ना त्यांना बनवायला कुठे करतील कार्यक्रम? झोपडपट्टीमध्ये दोन फुटाचा किंवा तीन फुटाचा रस्ता असतो तिथे कार्यक्रम कुठे उरकणार? आणि झोपडपट्टी मध्ये जास्तीत जास्त जागा २०० ते ३०० स्क्वेअर फिट असते, घरामध्ये असली तरी मी असे सांगत नाही की, देउ नये. त्यांना दुसऱ्या ठिकाणी व्यवस्था करा.

**रोहिदास पाटील :-**

सगळी व्यवस्था करावी.

**शशिकांत भोईर :-**

नाहीतरी नेहरू रोजगार योजने अंतर्गत आपले प्रशिक्षण चालूच आहे. देउ नये असे मी सांगत नाही. आपण जर भाड्याने दिले तर तिकडे राहतात त्या लोकांचे काय? गलिच्छ वस्तीवाले आहेत. त्यांना कार्यक्रमासाठी ती जागा लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांचा जो उपक्रम आहे. त्या उपक्रमासाठी त्यांना जागा देउ या बाकी समझा झोपडपट्टीतील लोकांचा काही कार्यक्रम आहे त्यांना बालवाडी, अंगणवाडी...........

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेब, संगणक कक्ष एकदा लावल्यानंतर ते उचलता येणार आहेत का? महागाची, डेलिकेट, नाजुक वस्तु आहे ती, कपाटासारखे थोडेच सरकवणार आहात. भावनात्मक घेउ नका.

**मा. सभापती :-**

फक्त व्यायामशाळा द्यायला काही हरकत नाही ना?

**शशिकांत भोईर :-**

तिथे व्यायामशाळा चालू नाही का? व्यायामशाळेची जी जागा आहे ती सुरू नाही किती दिवस.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती व्यायामशाळा आमदार निधीतून बांधलेली आहे. ती फक्त बांधून ठेवलेली आहे. तिथे व्यायामशाळा अजून सूरू झालेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

व्यायामशाळेचे जर प्रयोजन केले तर आजुबाजुचे जे झोपडपट्टी वाले आहेत. कारण आपला कायदा बोलतोच गलिच्छ वस्ती असतील त्यांनाच देण्याचा अधिकार आहे आणि त्याची सुद्धा त्या वर्षानुसार नोंद असली पाहिजे. तुम्हाला पाहिजे तर वाचून दाखवतो. मालमत्तेचा विनियोग ७९ कलम (ग) या कलमात काहीही अंतर्भुत असले तरी आयुक्तास महापालिकेच्या मंजुरीने किंवा राज्य शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या तरतुदी अन्वये गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करण्यात आलेली महापालिकेच्या मालकीची जमिन गलिच्छ वस्तीतील रहिवाशांच्या सरकारी संस्थेला अशा रितीने भाडेपट्टयाने देण्याकरिता नियम असलेल्या कमाल भाड्याच्या बाजारमुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाड्याने व महापालिका लादेल अशा शर्तीस अधिन राहून तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदती करिता भाडेपट्टयाने देता येईल. या खंडाखाली राज्यशासनाने द्यावयाची मान्यता ही अशा जमिनीबाबतच्या प्रकरणाच्या कोणत्याही वर्गाला किंवा अशा जमिनीबाबतच्या कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या बाबतीत देता येईल. परंतु, आयुक्तास महापालिका ठरवतील व लादतील अशा मुदतीकरिता व अशा शर्तीने अधिन राहून वेळोवेळी त्यात भाडेपट्टयामध्ये नुतनीकरण करता येईल. करता येईल पण गलिच्छ वस्तीसाठी. म्हणजे आता गलिच्छ वस्ती आहे तिकडे व्यायामशाळा मागीतले. प्रत्येक गलिच्छ वस्तीमध्ये प्रत्येक संघ असतात, अमुक रहिवाशी संघ असतात, तमुक रहिवाशी संघ. तर त्यांना विचार करायचा असला व्यायामशाळा आम्हाला आत्ता सुरू करायची आहे. नंतर आपण त्यांना जागा कुठे देणार? त्यासाठी शासनाने दिले. त्याच्या अगोदरही पुढे आणखीन आहे. स्पष्टिकरण दिले आहे. ह्याखंडाच्या प्रयोजनार्थ गलिच्छ वस्तीतील रहिवासी ह्याचेपण स्पष्टीकरण दिलेले आहे. ह्या खंडाच्या प्रयोजनार्थ गलिच्छ वस्तीतील रहीवासी ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ, नावं, ज्यांचे म्हणजे गलिच्छ वस्ती रहिवासी ह्याचेपण स्पष्टीकरण दिलेले आहे. (अ) १९७६ साली केलेल्या झोपडपट्टी गणनेच्यावेळी तयार केलेली झोपडपट्टी रहिवाशांच्या यादीत पण त्याचे नाव असले पाहिजे. (ब) अशाप्रकारे झोपडपट्टीची गणना करण्यात आली नसेल त्याबाबत १९७६ साली अंमलात आलेल्या विधानसभा यादीत म्हणजे कमीत कमी त्या यादीत तरी नाव पाहिजे. मी सांगणार नाही की, दुसऱ्या संस्थेला देउ नये. पण त्यांनी त्या गलिच्छ वस्तीसाठी केले आहे. आता ती गलिच्छ वस्तीच गणली जाईल. तरी सभागृहाने त्याचा विचार करावा. माझ्या माहितीने जे अधिनियम शासनातर्फे किंवा आपण बनविलेले आहेत त्याचाही आपण विचार करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे जर आपण व्यायामशाळा आणि बाकीचे समझा कार्यक्रम केले तर तिकडचे लोकपण तिकडे येणार आणि बाहेरचे लोकसुद्धा येउ शकतात ना? आणि अशीच पण ती व्यायामशाळा रिकामीच पडलेली आहे. मग जर ते सुरू केले तर लोकांना दोघांचा फायदा होउ शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

व्यायाम शाळा फक्त द्या. त्याच्यामध्ये गलिच्छ वस्तीला डिस्काउंट काहितरी द्या. जे विद्यार्थी आहेत त्यांना पन्नास टक्के तरी माफी द्यावी. अशी त्यांना आपण अट टाकायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

समझा, ह्याअधिनियमाखाली स्थानिक नगरसेवकांनी पत्रव्यवहार केला तर तुम्ही गलिच्छ वस्तीला द्या. आपण केलेला जो ठराव आहे तो नंतर विखंडीत होईल ना? आत्ता आपण अधिनियमाच्या अनुषंगाने चालतो की नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे समाजमंदिर आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

समाजमंदिर आहे पण व्यायामशाळेसाठी त्यांनी जागा डिमांड केली. तर पुढचे आपण काय करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

समाजमंदिर तर आपण पुर्ण समाजाला फ्री ऑफ कॉस्ट दिलेले आहे आणि ही वास्तु आमदार फंडातुन बांधलेली आहे. तुमचे म्हणणे आहे की व्यायामशाळा पडून आहे. अशा कंडीशनला देउन जर त्याचे बेनिफीट समाजाला होत असेल.....

**शशिकांत भोईर :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, जर आपण आत्ता भाड्याने दिले तद्नंतर हाच नियम धरून जर त्या लोकांनी डिमांड केले तद्नंतर तुम्ही ते हलवणार आहेत का? तुम्ही जर करार केला तीन वर्षाचा किंवा पाच वर्षाचा किंवा दहा वर्षाचा मग तुम्ही व्यायामशाळा समाजमंदिरामध्ये करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दोन वेगवेगळे स्ट्रक्चर आहेत ना?

**दिपक खांबित :-**

दोन वेगवेगळे स्ट्रक्चर आहेत.

**शशिकांत भोईर :-**

पण त्यांनी डिमांड केली समाजमंदिर लग्नकार्यासाठी किंवा आणखीकाही विधी असतील, समाजाचे काही कार्यक्रम असतील त्यासाठी पाहिजे असेल तर ती व्यायामशाळा आपण वेळेवर हटवू शकणार नाहीना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

समाजमंदिर ह्या संस्थेला द्यायचे नाही.

**शशिकांत भोईर :-**

समाजमंदिर हे लग्नसाठी किंवा त्यांच्या समाजाचे आणखीन काही विधी असतील त्यासाठी जर वापरत असतील आणि त्यात व्यायामशाळा जर अगोदरपासून समजा एखाद्या नगरसेवकाला वाटले की, माझ्या निधीतून व्यायामशाळेसाठी साहित्य आणायचे म्हणून त्यांनी आणले. साहित्य आणल्यानंतर त्या समाजमंदिरामध्ये आपण व्यायाम शाळा सूरु करणार का? याचापण विचार करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब, आपले म्हणणे बरोबर आहे. दोन वेगवेगळे स्ट्रक्चर आहेत, एक समाजमंदिर आणि एक व्यायामशाळा आणि ते तसेच पडून आहेत. गेली दहा वर्षे ते पडून आहेत.

**ज्युडी डिसोझा :-**

गेल्या दहा वर्षापासून ते बंद आहेत.

**शशिकांत भोईर :-**

असे पण ते बंद पडलेले आहेत तर व्यायामशाळा दिली तर काय हरकत आहे?

**रतन पाटील :-**

सध्या दोन्ही बंद आहेत. काही होत नाही.

**जयंत पाटील :-**

व्यायामशाळा बंद आहे. त्या व्यायामशाळेचा चांगला उपयोग होत असेल तर आपण आपल्या अटीशर्ती घाला आणि कमीत कमी कालावधी साठी द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक वर्षासाठी द्या.

**जयंत पाटील :-**

त्याच्यात आपल्याला प्रगती वाटली किंवा लोकांना चांगले वाटले तर वाढवता येईल. ती व्यायामशाळा बंदच आहे आणि बाजारमुल्याप्रमाणे द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

खांबित भाडे हे बाजारमुल्याप्रमाणे करा आणि त्या बाजारातील नागरिक जर दारिद्रयरेषेखाली असतील तर त्यांना पन्नास टक्के सवलत द्यावी आणि त्यांनी जी फी आकारणार आहेत त्याचे ॲग्रीमेंट महापालिकेशी करायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

साहेब, जे भाडे आहे ते ७९ च्या ड प्रमाणे बाजार मुल्याप्रमाणेच करावे लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाडे कमी करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत ना?

**शशिकांत भोईर :-**

स्थायी समितीला अधिकार असताना महासभेचासुद्धा विचार घ्यायचा आहे.

**जयंत पाटील :-**

अधिनियम आहेत ते स्थायीचे अधिकार काय आहेत. अधिनियमाप्रमाणेच जावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

तो महापालिकेचा अधिकार आहे. महासभा ठरवेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महासभेला रेकमेंन्ड करा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही नियम कसा बदलू शकणार?

**शशिकांत भोईर :-**

नियम बदलू शकणार नाही. मा. महासभेला अधिकार आहे. आपण जरी मंजुरी दिली तरी महासभेला पाठवायला लागेल.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेने स्थायी समितीला पॉवर दिलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

अधिनियमातील ७९ (ड) प्रमाणे मोबदला घेवून महापालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अधिनियमात जी तरतुद आहे त्याप्रमाणे निर्णय घ्या.

**जेन्वी आल्मेडा :-**

समाजमंदिरामध्ये ही संस्था प्रशिक्षण देणार आहेत ना.

**रोहिदास पाटील :-**

समाजमंदिराचा विषय घ्यायचा नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

पण त्या लोकांनी भाडेतत्वावर मागितले आहे की नाही?

**रोहिदास पाटील :-**

व्यायामशाळा वेगळी आहे समाजमंदिरे वेगळी आहेत.

**दिपक खांबित :-**

रू १,९३५/- भाडे होते.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला कशाला सांगता. त्याला आमची मंजूरी घ्यायची नाही. नियमानुसार जे आहे ते घ्यायचे. आम्ही कुठेतरी होय म्हटल नाही म्हटल तुम्ही काहीपण लिहाल.

**जयंत पाटील :-**

भाडे आपण बोलू शकतो. त्याने किती पैसे घ्यायचे हा आमचा विषय नाही. तो त्यांचा विषय आहे. त्यांनी मोफत द्यावे. काही टक्के पैसे घ्यावेत. खर्च वसुल झाला पाहिजे की नाही?

**रोहिदास पाटील :-**

नियमानुसार भाडे आकारून दिड वर्षासाठी द्यावे. व्यायामशाळा चालवते वेळी व्यायामशाळेमध्ये तिकडच्या लोकांना प्राधान्य देणे. जे मागासवर्गीय असतील त्यांना कन्सेशन देणे या सगळ्या अटी घाला.

**जेन्वी आल्मेडा :-**

प्रशिक्षण हे दुर्बल घटनेखाली असतात तेच घेतात, बी.पी.एल. खालची.

**जयंत पाटील :-**

खाजगी ह्याच्यात तो करतोय.

**ज्युडी डिसोझा :-**

पण ते फ्री ऑफ चार्ज करणार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेब, तुम्हाला ठराव कसा पहिजे तो निट येथे वाचून दाखवा. परत ‘‘ध’’ चा ‘‘मा’’ केला असे व्हायला नको.

**जयंत पाटील :-**

परत महापालिकेसारखे होईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपला एक ठराव करून घ्या, फौजदारी खटला दाखल करणे आणि पुण्याला पाठविणे सही कोणाची आहे हे पुण्याला जाउ द्या ना.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. महापालिकेची भाईंदर (पुर्व) येथे शाळा आहे आणि त्या शाळेमधील तलाव रोड येथे हॉल आहे तो सुद्धा नागरिकांसाठी कोणत्याही कामासाठी बंद केलेला आहे. तो कशासाठी बंद केलेला आहे? त्याचे कारण काय?

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीकडे गोषवारा दिलेला आहे. पुढच्या सभेला तो विषय येईल.

**रतन पाटील :-**

नवघर रोडच्या मैदानाचाही विषय येउ द्या. आपण एकदम चर्चा करूया.

**मा. सभापती :-**

विषय येणार आहे तेव्हा चर्चा करु.

**रोहिदास पाटील :-**

आपली जी टिपणी येते ती सविस्तर टिपणी तुम्ही देत नाही. त्यामुळे एक ठराव, एकच विषय पुन्हा पुन्हा आपआपल्या अकलेनुसार तो चर्चेला येतो. परंतु, मुळ ठराव कुठे आहे त्याचा पत्ताच लागत नाही. उद्देश एका बाजुला राहतोय आणि त्याच्यातुन विघ्न सुरु होतात. आता तुम्ही शाळा देऊ नये, तमाशासाठी देउ नये हे बरोबर आहे. पण तुम्ही देऊ नये सांगितल्याबरोबर लगेच सगळ्यांनाच बंद केले. मुलांचे आरोग्य शिबीर ही बंद केली. संस्कार शिबीरही बंद केली. सगळेच बंद केले. साहेब कशा पध्दतीने अर्थ लावता. अधिका-यांच्या मनोवृत्तीचा त्यांच्या बौध्दीकतेचा हा कस लागतो.

**जयंत पाटील :-**

हा ठराव स्थायी समितीमध्ये कधी झालेला आहे? तीन महिने होऊन गेले का?

**रोहिदास पाटील :-**

अशी कोणतीही महापालिका किंवा स्थायी स्थायी समिती सभा निर्दयी नाही. उत्तर देतात की, स्थायी समितीने ठरविले.

**जयंत पाटील :-**

जर तीन महिने होऊन गेले असतील तर पुन्हा विषय घेऊन या. आपण त्या विषयावर योग्य तो निर्णय घेऊ.

**नगरसचिव :-**

आता गोषवारा नविन आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, शहरातील टप-या उचलल्याबाबत मागे विषय झाला होता आणि पुढच्या मिटींगपूर्वी त्या टप-या उचलल्यापेक्षा असतील असे आश्वासन आम्हाला दिले गेले होते.

**मा. सभापती :-**

टप-या उचलल्या गेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

नाही.

**संजय तायशेट्ये :-**

मा. सभापतींच्यापरवानगीने बोलतो की, त्या दिवशी आपण जो विषय सभेत चर्चीला त्यानुसार वेस्टला गणेश मंदिर तसेच ईस्टला कार्यवाही सुरु आहे आणि ज्या टपरीवर व्यसनधीन वस्तु विकल्या जातात. त्यांच्यावर खास करु आमची कारवाई सुरु आहे. शाळा, मंदिर, मस्जिद तसेच प्रार्थनास्थळे सदरची बाब स्थायी समिती सभापती ह्यांच्या निदर्शनास वेळोवेळी आणलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

येणाऱ्या सभेस अहवाल सादर करा.

**जयंत पाटील :-**

आता सभा संपल्यानंतर तुम्ही माझ्यासोबत या. नवघर येथे हनुमान मंदिरासमोर तिथुन एस. एन. कॉलेजचा रस्ता, तिथे टपऱ्या नाहीत का असे आपले म्हणणे आहे.

**संजय तायशेट्ये :-**

प्राधान्याने जो विषय होता, व्यसनधीन वस्तु ज्या बुथवर विकल्या जातात ...........

**जयंत पाटील :-**

तुम्हाला ते कसे कळणार की, ह्या ठिकाणी ही वस्तु विकली जाते?

**रतन पाटील :-**

हे तुम्हाला कसे माहित पडणार?

**मा. सभापती :-**

हा आदेश त्यांना मी दिलेला.

**जयंत पाटील :-**

आपण हे सांगा की, आम्ही हळूहळू उचलतो. एक महिन्यामध्ये उचलतो की पंधरा दिवसामध्ये उचलतो ते सांगा ना.

**संजय तायशेट्ये :-**

टपऱ्या उचलण्याचे काम सुरु आहे. काम पूर्ण झाल्यानंतर सभेला अहवाल दिला जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, श्री. तायशेट्ये ह्यांचे अभिनंदन. खतगावकर साहेब, मागे श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब सभापती होते त्यावेळी सलग आपण चार ते पाच मिटींग घेतल्या. परंतु, कार्यवाही झाली नाही आणि त्यादिवशी कार्यवाही.

**प्रकरण क्र. ११७ :-**

भाईंदर (प.) आंबेडकर येथील समाजमंदिर व व्यायामशाळा इमारत भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १०७)

**ठराव क्र. १२० :-**

भाईंदर (प.) आंबेडकर नगर येथे महानगरपालिकेचे असलेले समाजमंदिर व व्यायामशाळा इमारत यांचे एकुण क्षेत्रफळ (समाजमंदिर ६७१.०० चौ. फुट व व्यायामशाळा ३८७.०० चौ. फुट) १०५८.०० चौ. फुट असुन सदर जागा मे. सांगली जिल्हा सदिच्छा मित्र मंडळ यांना गरीब व गरजू विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण व बचत गटात कार्यरत असलेल्या महिलांना रोजगार प्रशिक्षण देण्याकरिता मागणी केलेली आहे. आंबेडकर नगर येथील समाजमंदिर भाड्याने देण्यात येउ नये. चालू बाजार भावानुसार म्हणजेच रु. १९३५/- प्रति महिना या भाड्याने फक्त व्यायामशाळा इमारत एक वर्ष मुदतीकरीता अटीशर्तीसह करारनामा करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११८चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगला घेण्यात येईल. सचिव साहेब पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ११८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ मधील अनु. अ ते ब (सलग एकूण आठ मुद्दे) नुसार जकातीची आकारणी, मुल्यांकन व संकलन ह्यांचे नियमन करण्याकरिता केलेले ''स्थायी आदेश'' (मा. स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १११)

**ठराव क्र. १२१ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११९ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. सचिन पाटील कोण आहे? कमीत कमी त्यांनी सभागृहासमोर यावे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांची शिक्षण प्रणाली किती आहे ते आपण बघू.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही कॅन्डीडेट बघितला असेल. हा गोषवारा कोणाकडून आला आहे? प्रशानातर्फे आला आहे की सभापतीकडून आलेला आहे? प्रशासनाला खात्री पटली आहे ना. मग त्यांचे अनुभवाचे बोल आम्हाला सांगा ना की, अमुक वयाचा आहे. अमुक वर्षे इथे काम केले. इथे बरं केले तिथे बुरे केले ते सांगा.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

पंधराचे दहा का केले.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण करूया, त्यांची मागणी पंधराची आहे.

**रोहिदास पाटील :-**

पंधराचे सोळा द्या ना. सक्षम माणूस आहे का? हे सभागृह मान्यता देईल. हजार रुपयामध्ये आपल्याला काय फरक पडणणर आहे. त्यांचे क्वॉलिफिकेशन काय आहे? तुम्ही दहा हजाराचा ठराव का केला ते आधी मला सांगा.

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांची पंधरा हजाराची मागणी आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही खाली वाचा. त्याच्यावर लिहले आहे की, रोजी महापालिकेकडून अर्ज केलेला असून प्रतिमाह रु. १५,०००/- मानधनावर काम करण्याची सहमती दर्शविली आहे. म्हणजे तुमच्याशी आधी बोलणे झालेले आहे. मग तुम्ही पंधरा हजाराची सहमती दर्शविली. त्यांनी होय म्हटले तर तुम्ही दहा काय करता?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आधी रक्कम स्थायी समितीने ............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, पण त्याला काय स्वप्न पडले होते की, आपल्या पालिकेमध्ये वॅकेन्सी आहे. त्यांनी अर्ज कसा काय केला?

**शशिकांत भोईर :-**

कोणत्या वृत्तपत्रामध्ये तुम्ही निविदा काढली होती का?

**रोहिदास पाटील :-**

संगणक कक्षाच्या कामकाजातील तीन मुद्दे तुमच्या लक्षात राहतील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, कोणत्या पेपरमध्ये आपण अशी नोटीस दिलेली का? कोणीही सफाई कामगारासाठी अर्ज केला तर तुम्ही ताबडतोब देणार आहात का? साहेब, कोणीही असा डिमांड करु शकतो की, मला पंधरा हजार रुपये पाहिजे किंवा वीस हजार रुपये पाहिजे. त्याची पात्रता आहे का? ते चालवू शकतात का? उद्या आपण ठेवला दहा हजार ..........

**मा. सभापती :-**

यासाठी मी बोललो होतो की, मी सभागृहात बोलवतो तर तुम्ही बोलले त्याची गरज नाही.

**रोहिदास पाटील :-**

प्रशासनाची काय खात्री पटली आहे? इथे तुम्ही लिहले आहे की, तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती करता येत नाही. हे टेक्नीकल आहेत की, ऑपरेटर आहेत? संगणक प्रणालीमध्ये दोन प्रकारची माणसे येतात. एक ऑपरेटर स्कील आहे आणि टेक्निशियन आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण महापालिकेकडून के.डी.एम.सी. चे सॉफ्टवेअर उपलब्ध करुन घेतलेले आहे आणि त्याची प्रणाली आपण डेव्हलप करतो आहे आणि वापरातसुध्दा आहे. महापालिकेकडून प्रत्येक प्रभागामध्येसुध्दा ऑनलाईन फॅसिलिटी आपण कार्यन्वित केलेल्या आहेत. तिथेसुध्दा बिल घेऊन त्या ठिकाणी जर आपण नोंदी केल्या तर मेन कम्प्युटरलासुध्दा त्याच्या नोंदी होतात आणि हे सर्व कामकाज सुरळीत चालू आहे. ह्या वर्षापासून आपण ती ॲडिशनल फॅसिलिटी सुरु केलेली आहे आणि सदरचे बिल आपली मान्यता झाल्यानंतर, म्हणजे जे डीफर टॅक्स आकारणी होते त्याला दुरुस्ती झालेले निर्णय इम्लिमेंट करायला वेळ लागला आणि सदरचे बिल एका आठवड्याच्या आत पूर्ण शहरामध्ये इश्यु केलेले आहे. ही कार्यप्रणाली अशीच कायम राहण्यासाठी, त्याच्यात कोणतीही अडचण होऊ नये म्हणून के.डी.एम.सी. मध्ये त्यांनी डेली वेजेस वर पाटील हे काम करत होते. आम्ही तिथले श्री. सुभाष पाटील, सिस्टिम मॅनेजर यांच्याशी चर्चा केली असता आम्हाला एक चांगला माणूस पाहिजे. तर त्यांनी ते नाव मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्तावित केले होते आणि आपल्याला सिस्टिम मॅनेजर हे पद भरावे लागणार आहे. आजच त्यांचे इंटरव्ह्यू आहे. ही कार्यवाही पूर्ण होईपर्यंत दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रत्येक प्रभागात आणि मुख्य कार्यालयात जी प्रणाली चालू आहे त्याच्यात अडचण येऊ नये म्हणून मानधनावर श्री. पाटील ह्यांची सेवा आपण घेत आहोत. मी त्यांना विनंती करतो की, मा. सभापती सो. ह्याच्या परवानगीने त्यांनी त्यांचे इंन्ट्रोडक्शन आणि त्यांच्या कामाचा अनुभव सभेसमोर सादर करावे.

**सचिन पाटील :-**

माझे नाव श्री. सचिन प्रकाश पाटील मी डिप्लोमा इन कम्प्यूटर हार्डवेअर ॲन्ड नेटवर्किंग केलेले आहे, कम्लिटली. त्याच्यानंतर बरेच इंटरनॅशनल कोर्सेस केलेले आहेत. जेणेकरुन सिस्टम व्यवस्थित चालावे. मायक्रो सर्टिफाइड मी आहे. मी सिसको सर्टीफाइड आहे. आणि वायरलेस इंजिनियरही आहे. जी प्रणाली आपण आज महानगरपालिकेत करत आहोत आणि केलेले आहेत. के.डी.एम.सी., भिवंडी कॉर्पोरेशनमध्ये जे नेटवर्किंग जे बेसिक कोर आहे. की, आज मी जर नुसता कम्प्यूटर चालवला तर त्याचा काही उपयोग होत नाही. जोपर्यंत त्याला नेटवर्क नाही, कनेक्टीव्हीटी नाही तोपर्यंत त्याला काहीच नाही. ती एक सिस्टम कॉर्पोरेशनला करून दिलेली आहे. ही सिस्टम गेल्या तीन वर्षापासून चालत आहे आणि त्यांना मी माझी सर्विस ृदेत आहे. इकडे जे काही वायरलेस नेटवर्क आपण केलेले आहे. आणि सी.एफ.सी. हा कंसेप्ट आपण जो केलेला आहे. ऑनलाईन बिलिंग केलेले आहे. त्याच्यासाठी आपण वायरलेस नेटवर्क केलेले आहे. त्याच्यामध्ये जेव्हा डेव्हलप केले आहे. त्या स्टेजला मीच होतो आणि ते प्लॅनिंग करुन इम्प्लिमेंटेशन मीच करुन दिलेले आहे आणि ती सिस्टम आता चालतही आहे. पण ह्याच्यामागे असे आहे की, सिस्टम चालू राहायला काही सिक्यूरिटी इश्यू बरेच असतात. आपली जी काही सिस्टम मी ॲनॅलिसीस केली की आपले जे सर्व्हर आहेत जी काही सिस्टम आहे ती अप टू दि मार्क नसल्यामुळे उदया सिक्यूरिटी इश्यू होउ शकते. आपले जे काही बिल्स जनरेट होतात त्यांना काही सिक्यूरिटी होत नाही. त्यामुळे आपण इकडे एक सिस्टम लावून देणार आहे. ह्या पर्टीक्यूलर पिरीएडमध्ये ती सिस्टम कम्लिट होईल. आणि नंतर ती कोणीही कंटीन्यू केली. कोणी उदया इकडे सिस्टम मॅनेजर होईल, त्याचे डॉक्यूमेंटेशन कम्लिट होउन मी प्रणाली त्याच्याकडे राहील. आणि ही सिस्टम व्यवस्थित चालूच राहील. इकडे सिस्टम लावून देण्याची मला फार विलिंगनेस आहे आणि व्यवस्थित कम्प्यूटराझेशन कम्लिट करुन देणे. हे माझे इकडचे ध्येय आहे. धन्यवाद.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

के.डी.एम.सी. ला आपणहून अप्रोच झालो.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेमध्ये संगणक प्रणाली सुरू करावी हा एका दिवसाचा विषय नाही. संगणक प्रणाली सुरू करते वेळी आपण अनेक कन्सल्टशी चर्चा करायला महापालिका किंवा तत्सम ऑथोरिटी सक्षम होती. असे असताना महापालिकेत संगणक प्रणाली जेव्हा सुरू झाली. एक कोटी वीस लाख रुपये आपण खर्च केला. आता कल्याण डोंबिवलीचे प्रोग्राम आपण घेतल्यामुळे त्यांना एक लाख पंच्याऐशी हजार रुपये दर महिन्याला देतो. आत्ताच त्यांनी त्यांच्या निवेदनात सांगितले की, ह्या ह्या त्रुटी आहेत. ह्या त्रुटी ज्या एजन्सीने आपल्याला दिले. त्यांनी सांगितलेले आहे का की, या त्रुटी सोडून आपल्या कॉन्ट्रॅक्ट दिले होते. जो येईल तो लूटून जाईल. अशा पध्दतीचे काम आहे. त्या संगणक प्रणालीमध्ये लोकांना काय सर्विस मिळते? ज्या लोकांच्या टॅक्सच्या तक्रारी होत्या त्या आहेतच. आधी जसे टॅक्सचे आपण केले त्याच्याही तक्रारी राहिल्या. गेल्यावर्षी ज्यांना कन्सेशन दिलेली बिले होती ज्या अधिकृत शैक्षणिक संस्था आहेत त्यांना पुन्हा आपण डबल टॅक्सची बिले पाठवली. म्हणजे आपण किती काम करतो? कोणती प्रणाली आपल्याकडे चालू आहे. म्हणजे खरोखर हूशारीने काम होते की, काम करायचे म्हणून काम करतो आणि पैसे देतो. नागरिकांची आपण सोय करतो. की, आपण निधी काढतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य ह्याच्यावर मी स्पष्ट खुलासा करतो. आपण कल्याण डोंबिवलीची माहिती घेतली तर आपल्यालाही माहिती झाले असेल की, तिथे जी अदयावत सी.एफ.सी. तयार करण्यात आली आहे आणि ती

ऑल इंडियात रेकग्नाइज झालेली आहे. आणि तिथली सी.एफ.सी. अति उच्च दर्जाची कार्यान्वित झालेली आहे. त्यासाठी त्यांनी आज तारखेपर्यंत साडेसहा कोटी रुपये खर्च केलेले आहेत. आणि कोणत्याही शहरामध्ये ती प्रणाली करायची असेल तर बेसिक तेवढा खर्च करणे महापालिकेला अपेक्षित आहे. राज्यशासनाने यात धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, परत तेवढा सॉफ्टवेअर डेव्हलप करण्याची आवश्यकता नाही. के.डी.एम.सी. ची जी पॉलिसी आहे, त्यांनी केलेले जे सॉफ्टवेअर आहे. त्याची रॉयल्टी देउन ती प्रणाली विकत घ्यावी. आणि रिपिटेशन खर्च करू नये. हा धोरणात्मक निर्णय मिरा भाईंदर महापालिकाच काय सर्व महानगरपालिकांना पाळणे अपेक्षित आहे. आणि त्यासाठी तुम्ही बोलल्याप्रमाणे आपण दरमहा सव्वा लाख आणि त्यांचे बारा लाख देउन आपण त्यांची प्रणाली घेतलेली आहे. ती प्रणाली चालविण्यासाठी के.डी.एम.सी. कडे अदययावत असा त्यांचा स्टाफ आहे. आपल्याकडे एकही पद मंजूर नव्हते. आम्ही आल्यानंतर ती पदे मंजूर करुन घेतलेली आहेत. त्या भरतीची कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यासाठी आवश्यक असलेले सिस्टिम मॅनेजर, प्रोग्रामर आणि ॲनॅलिसिस्ट ही तीन पदे. इंटरव्हयूसाठी मुले येउन बसलेली आहेत. ही सभा झाल्यानंतर आपण त्यांचे इंटरव्ह्यू घेणार आहोत. तत्पूर्वी ती प्रणाली त्यांना जे सव्वा लाख आपण मंथली देतो त्याच्या असिस्टंटने चालवतो. याचा अर्थ बिघाड झाल्यावर आपण त्यांना बोलवून घेतो. तर ह्यासाठी जे आवश्यक टेक्निकल स्टाफ आपण कार्यान्वित करेपर्यंत आपण त्यांचा एक एक्सपर्ट माणूस मागितला होता. पण त्यांना ते देणे शक्य झाले नाही. तर त्यांच्याकडे सॉफ्टवेअर कंपनीकडून जो माणूस कार्यरत होता डेली वेजेस वर. तर त्यांनी तो उपलब्ध करून दयायला तयार आहे. जर आपण मान्यता दिली तर त्याला ठेवू. नाही दिली तर काही आवश्यकता नाही. जसे आहे तसे आम्ही प्रयत्न करु चालवू. निश्चितच आपल्याला जर पाच महिन्यासाठी उपलब्ध करुन दिले तर मुदतीची बाब आहे. त्यांचे जे क्वॉलिफीकेशन आहे, त्यांचा अनुभव त्यांनी आपल्यासमोर मांडलेला आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, नागरिकांच्या वेल्फेअरसाठी जर ह्याची पाच महिन्यासाठी नियुक्ती झाली तर आपल्याला मदत होईल.

**रोहिदास पाटील :-**

त्या इंटरव्ह्यूमध्ये ते आहेत की नाहीत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

त्या इंटरव्ह्यू मध्ये ते नाहीत. कम्प्यूटर इंजिनिअरला आपण इंटरव्ह्यूला बोलवलेले आहे. कम्प्यूटर इंजिनियरसाठी आपल्याला फार जास्तीची फी दयावी लागते आणि कोणी असा टेम्पररी येणार नाही, कम्प्यूटर इंजिनियर. हा डिप्लोमा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी तेच म्हणतो ना. पण पंधरा हजाराचे दहा का केले? तुम्ही सक्षम माणूस न घेता पुन्हा ट्रायल बेसिसवर ठेवणार. आल्यानंतर परत सांगणार की, ते पाच महिन्यासाठी आले होते. त्यांनी सिस्टम बदलून गेलेले आहेत. तुम्ही आत्ता के.डी.एम.सी. ला एक लाख पंच्याऐंशी हजार पेमेंट करता आत्ता आपण मंन्थली पेमेंट करतो की नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

चोवीस तास माणूस नाही देवू शकत. जशी आपल्याला गरज पडेल तेव्हा त्यांना बोलावून घेतो.

**रोहिदास पाटील :-**

मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे. मी सभागृहात अजून सांगतो. ते इंटरव्ह्यूमध्ये नसतील. त्यांना पाच महिने ठेवायचे आणि परत मोकळे करायचे. महापालिकेचे नुकसान होईल हे लक्षात घ्या. आणि मग तुम्ही काय ते ठरवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आता जे इंटरव्ह्यू घेणार आहात त्यांना एका महिन्याच्या आत करा ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

सुप्रिम कोर्टाचे निर्णय आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ११९ :-**

नागरी सुविधा केंद्रात विशेष कार्यअधिकारी (OSD) यांची तात्पुरत्या स्वरूपात पाच महिन्याकरीता नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. १२२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे तळमजल्यावर सुसज्ज असे नागरी सुविधा केंद्र असून सदर केंद्रात पाणीपुरवठा, करविभाग, जन्म - मृत्यू इत्यादी विभागाचे कामकाज चालू आहे.

सध्या मोठ्या प्रमाणावर कर विभागाच्या बिलाचे, वसुलीचे काम चालू आहे. भाईंदर (पुर्व) मिरा रोड या प्रभाग कार्यालयात देखील ऑनलाईन सेवा नागरीकांना सुरू केली आहे. सदर सेवा सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी सध्या महानगरपालिकेकडे संगणकीय प्रणालीचे परीपुर्ण तांत्रिक कामकाज करण्याकरिता अधिकारी उपलब्ध नाही. सद्य स्थितीत सदरचे काम ठेका पद्धतीने ठेकेदाराचे संगणक चालक यांचेकडून

करून घेतले जात आहे. संगणक प्रणालीत अचानक तांत्रिक बाब उद्‌भवल्यास सदरचे काम संगणक चालक यांचेकडून पुर्ण करून घेणे शक्य होत नाही. याकरीता संगणक प्रणालीच्या तत्रज्ञानाची परीपुर्ण माहिती असणारा असा एकही अधिकारी उपलब्ध नाही. त्यामुळे दैनंदिन कामे सुरळीत पार पाडणे अडचणीचे होत आहे. मनपाचे नागरी सुविधा केंद्रात संगणकाचे तांत्रिक कामाचे परीपुर्ण ज्ञान असलेला अधिकारी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणे गरजेचे आहे. नागरी सुविधा केंद्राचे संपूर्ण तांत्रिक काम करण्यासाठी श्री. सचिन प्रकाश पाटील यांनी दि. ०३/१०/२००६ रोजी महानगरपालिकेकडे विनंती अर्ज केलेला असून प्रतिमाह रू. १५०००/- मानधनावर काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. श्री. सचिन प्रकाश पाटील यांचेकडे संगणकीय काम करण्याचा चांगला अनुभव आहे. या बाबींचा विचार करता सद्य स्थितीत नागरी सुविधा केंद्रातील संगणक प्रणालीचे संपुर्ण कामकाज पाहण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये श्री. सचिन प्रकाश पाटील यांना विशेष कार्यअधिकारी (OSD) म्हणून तात्पुरत्या स्वरूपात पाच महिन्याकरीता नेमणूक करणेस तसच रू. १००००/- प्रतिमाह इतके मानधन देणेस ही सभा मंजुरी देत आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२० चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

एल.सी.डी. आणायला सांगितले त्याचे काय केले? आम्हाला तुमचा तोंडी अहवाल नको. इथे एल.सी.डी. प्रोजेक्ट, पॉवर पॉईंट पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपल्या सुचनेप्रमाणे एल.सी.डी ची उपलब्धता केली जाईल.

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळेला येईल.

**नगरसचिव :-**

गोषवारा येईल.

**मा. सभापती :-**

गोषवारा येतो.

**रोहिदास पाटील :-**

पुढच्या बैठकीत ते सांगता पण येत नाही. संतोष पाटील यांचा सांगितला होता. तोही आला नाही. तुम्ही सबवे चे सांगितले तेही आले नाही. सभापती साहेब, तुमच्यावर आमचा विश्वास उडतो असे करु नका. घाई करत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

घाई करू नका. संतोष पाटील यांचा विषय आम्ही घेतलेला आहे. ते डी.पी.सी. च्या बैठकीत आहे. डायरेक्ट तुमच्याकडे येण्याची गरज नाही.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, रत्नप्रभा मोघे यांनी आपल्याला ॲफिडेवीट लिहून दिले आहे का? त्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ॲफिडेवीट करून घेईपर्यंत ते इफेक्ट होणार नाही. स्थायी समितीमध्ये जो निर्णय झालेला आहे त्याचीच अंमलबजावणी होईल.

**जयंत पाटील :-**

नक्की काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपले जे निर्णय झालेले आहेत ना.

**जयंत पाटील :-**

म्हणजे आपला निर्णय अनऑफिशिअली झाला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

नाही. आपला निर्णय झाला होता.

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. मला एक माहिती दया.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

याबाबत मी सभागृहाला माहिती देतो की, हे चेसीस घेउनच अशा प्रकारचे व्हेहीकल बांधले जातात. आणि मुंबई संध्या हमारा महानगर हिंदी अशा पेपरला जाहिरात देउन आपण ही निविदा मागविलेल्या आहेत. आणि कामाविदा ही जी पुण्याची दर्जेदार कंपनी आहे. ती इंटरनॅशनल लेव्हलला ह्या सिव्हरेंज टँक व्हॅक्यूम क्लिनर सप्लाय करतात. तर मंजूर करायला हरकत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याच्याबद्दल नाही. आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये आत्तापर्यंत आपल्याकडे किती व्हॅक्यूम टॅंकर आहेत.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आत्ता सध्या आपल्याकडे फक्त एक व्हेईकल आहे.

**रतन पाटील :-**

चालू?

**अजीज शेख :-**

होय चालू.

**रतन पाटील :-**

बंद? चालू किती आहेत आणि बंद किती आहेत? आपल्याकडे किती? मला स्पष्ट सांगा.

**रोहिदास पाटील :-**

आधी याला मंजूरी दिलेली आहे. मा. महासभेत मंजूरी दिलेली आहे.

**अजीज शेख :-**

होय दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे पेंन्डिग काम आहे?

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

तुम्ही तो प्रस्ताव मंजूर केला आणि आत्ता ज्या निविदा आलेल्या आहेत त्यांना मंजूरी दयायची आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे हयाचा अगोदर आपण घेतलेला मिरा भाईदर महानगरपालिकेकडे व्हॅक्यूम टॅंकर आहे.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

एकच आहे सध्या.

**रतन पाटील :-**

मी दाखवतो ना आपल्याकडे माझ्याकडे फोटो आहेत. आपल्याकडे नो टच अशीसुध्दा मशिनरी आहे. फक्त टचसुध्दा झालेली नाही. पाच वर्षापासून जागच्या जागी उभ्या आहेत. हे फोटो मी सभागृहाला दाखवतो. एक टॅंकर आहे तो पाच वर्षे जागेवर उभे आहेत. ती कशासाठी मागवली वापर नाही जागेवर उभी आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ही ट्रॉली आहे.

**रतन पाटील :-**

ह्या वापरल्या गेल्या नाहीत. ह्या नविन मागवल्या गेल्या आणि जशा आहेत तशाच जागच्या जागेवर उभ्या आहेत. मी विरोध करत नाही. पण ह्या कशासाठी मागवल्या होत्या? नवीन आहेत. कुठलीही वापरात नाही.

**मा. सभापती :-**

शेख साहेब याचा खुलासा करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कांबळे, आतापर्यंत आपल्याकडे असे किती व्हॅक्युम क्लिनर आहेत. फक्त एकच आहे आणि ट्रॉली किती आहेत?

**राजकुमार कांबळे :-**

ते जुने भंगारमधले आहेत.

**रतन पाटील :-**

चांगल्या नविन आहेत. त्या कलरच बघा कसा दिसतोय. भंगारच्या ट्रॉलीला नवीन कलर मारला का? भाईंदर वेस्टची कमला पार्क येथे जी पाण्याची टाकी आहे. त्या टाकीच्या खाली नो टच जशीच्या तशी ही गाडी उभी आहे. कुठलीही टच केलेली नाही आणि जागेवरुन हलवलेलीसुध्दा नाही. कशासाठी ती मागवली? प्रशासनाला याची माहिती आहे का?

**जयंत पाटील :-**

कधी आणलेली गाडी आहे? किती वर्ष झाली? मॉडेल कधीचे आहे?

**मा. सभापती :-**

रतन पाटील आपल्याला काही जायची घाई आहे का?

**रतन पाटील :-**

बिलकूल नाही.

**मा. सभापती :-**

मग सावकाश बोला ना. ऐकतो ना. सभागृह हे ऐकायलाच बसले आहे. काय एवढी घाई करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवा-याप्रमाणे ठराव मंजुर करावा.

**शशिकांत भोईर** :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवा-याप्रमाणे निविदांना मंजुरी देण्यात यावी असा मी ठराव मांडतो.

**प्रकरण क्र. १२० :-**

महापालिकेस डोअर मेटल डिटेक्टर व हॅण्ड मेटल डिटेक्टर खरेदीस आर्थिक, प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.

**ठराव क्र. १२३ :-**

महानगरपालिका मुख्यसभागृह, स्थायी समिती सभागृह मध्ये शस्त्र अस्त्र प्रतिबंध करणे करिता सभागृह बाहेर डोअर मेटल डिटेक्टर बसविणे सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ठरले आहे.

महानगरपालिका अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार भांडारगृह (अ) सामान्य प्रशासन फर्निचर व देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षाअंतर्गत रू. १०,००,०००/- (दहा लाखाची) तरतुद करणेंत आलेली आहे.

तरी महानगरपालिका मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ (खंड) ड अन्वये सदर मशिन खरेदी करणे कामी व येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १२१ :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता दोन नविन टाटा चेसीज खरेदी कामी त्यावर व्हॅक्युम टॅंकरची बांधणी (फॅब्रीकेशन) करणे कामी मा. महासभा दि. १८/०४/२००६ रोजी, ठराव क्र. १० अन्वये मंजूरी दिली आहे. टाटा उत्पादीत कंपनी मे युनिटेक ऑटोमोबाईल प्रा. लि. यांचे कडून कडून सरकारी दरानुसार १) LPT 709 / 38 EX CAB BS 2 (VC NO. 282 10938000R) रू. ६,१२,७२५/- (सर्व करासहीत) २) LPT 1109 / 42 EX CLBE 2 (VC NO. 215 38442000R) रू. ७,१२,५४०/- (सर्व करासहीत) याप्रमाणे चेसीज खरेदी करण्यात आल्या.

वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या टाटा मॉडेलच्या चेसीज वर मैलवाहू व्हॅक्युम टॅंकर बांधणी (फॅब्रीकेशन) करणे कामाची दि. १२/०८/२००६ रोजी दै. मुंबई संध्या, दै. हमारा महानगर हिंदी या वृत्तपत्रात जाहिर निविदा नोटीस प्रसिद्ध करून मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाकाराने दर सादर केले आहेत.

<table>
<tr><th rowspan="2">Sr</th><th rowspan="2">Description</th><th colspan="3">Contractor Name & Rate per unit</th></tr>
<tr><th>मे. कामअविदा इन्व्हा. इंजि. प्रा. लि.</th><th>मे. श्री. बालाजी इन्टरप्रायजेस</th><th>मे. स्नेहल एन्टरप्रायजेस</th></tr>
<tr><td>१</td><td>Fabrication and Installation of Suction of 3000 Ltr. capacity machine on a TATA 709 chasis supplied by the corporation</td><td rowspan="2">रू. २२,३८,३२३/- सर्व करासहीत</td><td rowspan="2">रू. २२,०४,५३७/- सर्व करासहीत</td><td rowspan="2">रू. २२,४९,५९९/- सर्व करासहीत</td></tr>
<tr><td>२.</td><td>Fabrication and Installation of Suction of 6000 Ltr. capacity machine on a TATA 1109 chasis supplied by the corporation</td></tr>
</table>

वरील तुलनात्मक तक्ता पाहता टाटा मॉडेलच्या चेसीजवर मैलवाहू व्हॅक्युम टँकर बांधणी (फॅब्रीकेशन) करणे कामी प्राप्त निविदापैकी मे. श्री. बालाजी इन्टरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर (सर्व करासहीत) इतर दोन निविदाकारांचे तुलनेत सर्वात कमी रू. २२,०४,५३७/- आहे. सदरचा दर जादा असल्याने संबंधित निविदाकारांचे दरासंबंधी वाटाघाटी करणेकामी बोलाविले असता. त्यांनी निविदेत सादर केलेले दरात घट करून रू. २१,९३,५३७/- या दरात काम करण्याचे मान्य केले असून कमी दराची निविदा स्विकारणेस हि मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२२ चे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

अध्यक्ष महोदय, उत्तनचे जे भाजी मार्केट, मच्छी मार्केट आहे तिथे आज दहा दिवस झाले लाईट गेलेली आहे. फॅनसुध्दा बिघडलेले आहेत. मी वारंवार त्यांना रिमाइन्डर देउनसुध्दा व्यवस्था झालेली नाही.

**मा. सभापती :-**

याचा खुलासा करावा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही नगरसेवकांचे ऐकत नाही.

**मा. सभापती :-**

अधिकारी कोण आहेत?

**जेन्वी अल्मेडा :-**

लवकरात लवकर लावून घ्या.

**मा. सभापती :-**

आजच्या सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, अधिकारी ह्यांना दिवाळीच्या तसेच रमझानच्या हार्दिक शुभेच्छा. मागील सभेप्रमाणे आजची सभा देखील चांगल्या तऱ्हेने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली म्हणून सर्वांचे आभार व्यक्त करुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ दुपारी १.१५ वा. :-**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**